# प्रा स्ता वि क

## विषय प्रवेश

महाविद्यालयात शिकत असल्यापासूनच माझ्या मनात अष्ट महागदाविषयी सतत विचार येत असे. त्याच्यावर जास्त विचार करुन योग्य चिकित्सा करुन मनुष्य प्राण्याला सुटका कशी करता येईल असा प्रश्न नेहमी मनात येई.

अष्टु महागद म्हणजे ज्यामुळे मरण येते किंवा ते बरे करण्यास कठीण आहेत. त्यावर अधिकाधिक औषधी निघाली असली तरी पथ्य करण्यास अशक्य असल्यामुळे मनुष्य मृत्युमुखी पडतो.

असे अष्ट महारोग म्हणजे :-

वातव्याधी, अपस्मार, कुष्ठ, शोथ, अश्मरी, मेह, भगंदर, ग्रहणी, अर्श, उदर, हे होत.

वरीलपैकी अग्निमांद्य हे ज्याचे मूळ कारण आहे असे विकार ग्रहणी, अर्श, व उदर हे प्राधान्याने आहेत. काय - म्हणजे अग्नि. काय चिकित्सेतील एखाद्या विषयावर प्रबंध लिहितांना " रोगा : सर्वेऽपि मंदेऽग्नौ सुतरां उदराणि च " उदर या विषयावर जास्त अभ्यास करण्याचे मी ठरविले.

" कृश शरीर, उदराचा नगारा, पाय सुजलेले, चेहरा ओजक्षय-युक्त जिवंत प्रेतवत निस्तेज, कांतीहीन, भूक लागत नाही, अन्नावरची वासना उडून गेलेली, बसले तर निजता येत नाही, निजले तर उठता येत नाही, कुशीला वळले तर शरीराला रग लागलेली, शौचाला अजिबात होत नाही, झालेच तर ग्रंथिल व अल्प, मूत्रासंग, मूत्राअल्प व रक्तवर्ण अशी सामन्यत: उदरी रुग्णाची परिस्थिती असते.

वैदिक युगानंतर आयुर्वेदीय संहिताकाल येतो. चरक संहिता तसेच सुश्रुत संहिता या मुख्य संहिता होत. वरील दोन्ही संहितामध्यें उदर रोगाचें विस्तृत वर्णन तसेच चिकित्सा मिळते. याशिवाय भेलसंहिता, हारीतसंहिता, काश्यपसंहिता, वगैरे संहितातही उदर रोगांचें विवेचन आहे. भेलसंहिता आर्ष ग्रन्थ असून त्यामध्यें या रोगासंबंधाचें विवेचन आढळतें. हारीतसंहितेत एरंडदल नालातून पाणी काढण्यासंबंधीं उल्लेख आहे. ती संहिता तदनंतरच्या अन्य संहिताकारांनीं संपादिलेली उपलब्ध आहे. काश्यप संहिता अपूर्ण आहे आणि तिचा पुष्कळसा भाग नष्ट झालेला आहे. त्यामुळे उदर रोगावर योग्य वर्णन मिळत नाहीं.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

<u>पादटीप १ चालू</u> :-

पुत्रायजनप्रार्थनया वरुण प्रसादात हरिश्चंद्रस्य पुत्रप्राप्तिः, पुत्रप्राप्तौ हरिश्चंद्र प्रति पुत्रेण यजस्वेति वरुणेनोक्ते पुत्रे निर्दशे जाते त्वा यजा इतिहरिश्चंद्रोक्तिः, दशादिनात्परं वरुण आगते दन्तान्वस्य जायन्ताभय त्वा यजा इत्युक्तिः। दन्तोत्पत्स्यनन्तरं वरुणे प्राप्ते दन्तपतनान्तरं त्वा यजा इति हरिश्चंद्रोक्तिः, दन्तपतनान्तरं प्राप्ते वरुणे यदा पुनर्दन्ता जायन्तें तदा मेध्यो भवेद् अनन्तरं त्वामनेन यजामीत्युक्तिः, पुनर्दन्तोत्पत्तावागते वरुणे यं युद्धादिकुशलो भवत्वनन्तरं तेन यागं करिष्यामीत्युक्तिः, पुत्रे युद्धादिकुशले जाते वरुणे प्राप्ते यजामीत्युक्त्वा हरिश्चन्द्रकृतं पुत्राय पुत्रायजनसंकल्पकथनम्। पितृवचनश्रवणानन्तरं रोहितस्य धनुरादायारण्यगमनम्, वरुणकोपाद्धरिश्चन्द्रस्योदरोत्पत्तिश्रवणानन्तरं रोहितस्यारण्याद्ग्रामगमनप्रवृत्तिः, तं प्रति पुरुषरूपेन्द्रस्योक्तिः। वरुणेन गृहीतस्य हरिश्चन्द्रस्य उदरं जलै। जलेन पूरितं उच्छूनमहोदरनामकं रोगस्य रूपं उत्पन्नम्।

// श्री धन्वन्तरये नम: //

# " उदर रोग चिकित्सा विशेष अभ्यास "

## ऐतिहासिक पार्श्वभूमि :-

विश्वाच्या साहित्यामध्यें वेद सर्वांत प्राचीन मानले गेले आहेत. आयुर्वेद हे अथर्ववेदाचें अंग आहे, आणि उदर रोगाचें वर्णन अथर्ववेदांत मिळतें. यावरून उदर व्याधीचें प्राचीनत्व स्पष्ट होतें.

वरुण ही जलाची देवता मानली गेली आहे. त्या देवतेच्या कोपानेंच जलोदर व्याधीचा प्रादुर्भाव होतो.

### राजा हरिश्चंद्राला जलोदर झाल्याची कथा

ऐतरेय ब्राह्मण ग्रंथामध्यें शुन:शेपाच्या कथेमध्येंच[१] वरुणाच्या कोपानें राजा हरिश्चंद्राला जलोदर झाल्याचा उल्लेख आहे, या ग्रंथातून कर्मकाण्डाचा विषय आहे. आणि व्याधीपासून मुक्त होण्यासाठीं यज्ञ-पूजादि " दैवव्यपाश्रय चिकित्सा " वर्णिली आहे. वेदामध्यें भिन्नभिन्न व्याधींपासून मुक्त होण्यासाठीं त्या त्या देवतांची स्तुति करणारें मंत्र सांगितलें आहेत, मनु:स्मृतिमध्यें वरुणाच्या कोपानें जलोदर रोगाची उत्पत्ति झालेचे वर्णन आहे.

---

१. हरिश्चंद्रस्य नारदं प्रति एकया गाथया पुत्रफल ~~+~~ विषयक: प्रश्न: नारदस्य दशभिर्गाथाभि: पुत्रफल विषयकं प्रत्युत्तरम् । हरिश्चंद्रं प्रति नारदस्य पुत्रप्राप्त्यर्थ वरुणं राजानुमुपधावेत्युक्ति: ।

आपल्या स्वतः:च्या हालचालीवर नियंत्रण नसणे त्याबाबतीत दुस-यावर परावलंबी असलेली केविलवाणी स्थिती पाहून या रुग्णाला रोगमुक्त निदान लक्षणामुक्त कसे करतां येते ते पहावे, प्रयत्न करावा म्हणून मी पीएच.डी. साठी "उदररोग चिकित्सा विशेष अभ्यास" ह्या विषयाची निवड केली.

वर वर्णन केल्याप्रमाणे उदरस्थ रोग विशेष म्हणून ज्या उदर रोगाचे आयुर्वेदीय वाङ्मयांत वैशिष्टयाने वर्णन केलेले आहे, तो रोग विशेष विस्तरशः पाहणे, त्याचे निदान करणे, लक्षणे पडताळून पहाणे, संप्राप्तिदृष्टया निदानाचे व चिकित्सेचे वर्गिकरण करणे, या-गोष्टींवर लक्ष केंद्रित केले आहे.

विशेषतः उदरवृध्दि, यकृत व प्लिहा वृध्दि, जलोदर, शोथ अग्निमांद्य, मलमूत्र संग, अशा प्रधान लक्षणांनी युक्त, अशा उदरी रुग्णांची मी निवड केली.

रुग्णालयातील रुग्णांवर निदान करुन प्रत्यक्ष चिकित्सा करणे, व कांहीं निष्कर्ष काढून दाखवणे हे सदर प्रबंधाचे प्रयोजन आहे.

-x-x-x-x-x-x-x-x-

पादटीप १ चालू :-

इन्द्ररोहितयोः संवादे द्वितीयादिषष्ठान्तपर्यायप्रदर्शनम् । अजीगर्तरोहितसंवादप्रदर्शनम् शुनःशेपसहितपुत्रागमनादूर्ध्वकालिकवृत्तान्तप्रदर्शनम्, हरिश्चन्द्रस्य राजसूयानुष्ठानप्रदर्शनम्। पितुरजीगर्तस्य शुनःशेपविशसनप्रवृत्तिप्रदर्शनम्, शुनःशेपवृत्तान्तप्रदर्शनम् । शुनःशेपस्य स्वरक्षणार्थं प्रजापत्यादिप्रार्थनम् । सर्वदेवतानुग्रहेण शुनःशेपबन्धमोक्षस्य हरिश्चंद्रारोग्यस्य च प्रदर्शनम्,

तस्य ह स्मर्च्यृक्तायां विपाशो मुमुचे कनीय ऐक्ष्वाकस्योदरं भवत्युत्तमस्यामेवर्च्युक्तायां विपाशो मुमुचे गदऐक्ष्वाक आस ।। १६ ।।

तस्य पूर्वोक्तस्य त्र्यृचस्य संबन्धिन्यामृच्यृच्येकैकस्यामृच्युक्तायां क्रमेण शुनःशेपस्य पाशो विमुमुचे विशेषेण मुक्तो भूत । ऐक्ष्वाकस्य हरिश्चन्द्रस्य यन्महोदरं तदपि क्रमेण कनीयो स्वल्पं भवति । उत्तमस्यामृच्युक्तायां पाशो विमुमुच एव सर्वात्मना मुक्तो भूत । ऐक्ष्वाको प्यगदो निःशेषेण रोगरहित आस ।

ऐतरेयब्राह्मणभाष्ये त्रयस्त्रिंशाध्याये चतुर्थः खण्ड ।

---

अथ हैवाकं वरुणो जग्राह तस्य होदरं जज्ञे ।

तदुह रोहितः शुश्राव सो रण्याद्ग्राममेयायतमिन्द्र.... ।

संहिता कालानंतर उदर रोगावर विशेष कार्य झालेले नाहीं. अष्टांग संग्रह तथा अष्टांग हृदयाची रचना करणारा वाग्भट या युगातील प्रमुख लेखक मानला जातो. या दोन्ही ग्रंथात फारच साम्य आहे. चरक संहिता व सुश्रुत संहिता यानंतर अष्टाग संग्रहाला इतकी प्रसिध्दी मिळाली कीं, बृहत्रयी म्हणून आयुर्वेदीय जगतात या तिहींना संबोधण्यात येऊ लागेले. चरक व सुश्रुत या दोन संहितांच्या आधारें वाग्भटानें आपले लेखन केलें. चक्रपाणी चरक संहितेवरील व डल्हण सुश्रुत संहितेवरील प्रसिध्द टीकाकार आहेत. यांच्या टीकावरुनच मूळ सूत्रांचे स्पष्टीकरण झालेले आहे. डल्हण व चक्रपाणी यांचा काल सुमारें ११ वें शतक मानला जातो. अशा त-हेनें तीनही प्राचीन ग्रंथात उदराचें विस्तृत वर्णन मिळते. चरक संहितेच्या चिकित्सा स्थानाच्या १३ व्या अध्यायात उदर रोगाचें निदान - पूर्वरूप रूप संप्राप्ति व चिकित्सा यांचे सविस्त विवेचन केले आहे. सुश्रुताच्या निदानस्थानच्या ७ व्या अध्यायांत ह्याप्रमाणें अष्टांगसंग्रह व अष्टांग हृदयाच्या निदानस्थानाच्या १२ व्या अध्यायात उदर रोगाचे निदान, लक्षण व संप्राप्ति यांचा उल्लेख आहे. उपर्युक्त दोन्ही ग्रंथांच्या चिकित्सा स्थानामध्यें केवळ चिकित्सेचा उल्लेख केलेला आहे. या विषयावर अष्टांग संग्रह व अष्टांग हृदयाच्या लेखकांनीं चरक व सुश्रुत संहितेतील वचनें उद्घृत केलेली आहेत. त्यामधील अधिक ग्राह्य मताचा स्वीकार केलेला आहे. चरक व सुश्रुत यानंतरच्या ग्रंथांमध्यें अष्टांगसंग्रह व अष्टांगहृदयकारानें अनुभव तथा व्यावहारिक ज्ञानाच्या आधाराव ठिकठिकाणी आवश्यक त्या सुधारणा केलेल्या आहेत. उदा. चरक व सुश्रुतांत जलोदरामध्यें जल निर्हरणासंबंधीं उल्लेख आहे. जेव्हां औषधींनी[१] जलोदर बरे होणार नाहीं तेव्हा सशस्त्राकर्म करावें व ते राजा पालकांची मान्यता घेऊन राजमान्य वैद्याकडून करवून घ्यावें असा अष्टांग हृदयकार वाग्भट यांनी स्पष्ट उल्लेख केलेला आहे.

---

१ इत्यौषधप्रशमे कि त्रिषु बध्दोदरादिषु ।
प्रयुंजीत भिषक् शस्त्रामार्तबंधुनुपार्थित: । वा. चि. १५

संग्रहकालांतील माधव निदान हा महत्वपूर्ण ग्रंथ आहे. माधवांनीं चरक, सुश्रुत तथा अष्टांग हृदय या तिन्हीमधील निदान, पूर्वरूप, रूप, उपशय, संप्राप्ति, उपद्रव तथा रिष्ट संबंधी श्लोकांचा संग्रह केलेला आहे. या ग्रंथावर विजयरक्षित व श्रीकण्ठदत्त यांनी मधुकोश टीका व श्री. वाचस्पति वैद्य यांनी आतंकदर्पण ही टीका लिहिली. उदर रोगाच्या निदानांत या ग्रंथात काहीं नविन तत्व मिळत नाहीं.

## - उदर रोगाचा भिन्न आयुर्वेदीय ग्रंथामध्ये वर्णनक्रम -

| | ग्रंथ | पूर्वरोगाध्याय | उदररोगाध्याय | पश्चात रोगाध्याय |
|---|---|---|---|---|
| . | चरक संहिता | श्वयथु | उदर चिकित्सा [च. वि. १३] | अर्श |
| . | सुश्रुत संहिता | प्रमेह-निदान | उदर निदान [सु. नि. ७] | मूढगर्भ |
| . | सुश्रुत संहिता | मधुमेह | उदर चिकित्सा [ सु. चि. १४] | मुढगर्भ |
| . | अष्टांग संग्रह | विद्रधी-वृध्दि | उदर निदान | पाण्डुरोग |
| . | अष्टांग हृदय | गुल्म निदान | उदर निदान [ वा. नि. १२] | शोफ-विसर्प |
| . | अष्टांग हृदय | गुल्म चिकित्सा | उदर चिकित्सा [वा. चि. १५] | पाण्डु चिकित्सा |
| . | शाङ.र्गधर संहिता | हृदय रोग | उदर रोग [शार्ङ्ग .७] | गुल्मरोग |
| . | चक्रदत्त | प्रमेह स्थौल्य चिकित्सा | उदर रोग [चक्र. अ. ३७] | यकृत्प्लीहाशोथ चिकित्सा |

| ग्रंथ | पूर्वरोगाध्याय | उदररोगाध्याय | पश्चात रोगाध्याय |
|---|---|---|---|
| माधवनिदान | मेदोरोग निदान | उदर निदान | शोथ निदान |
| सिध्दांत निदान | " " | " | " |
| भावप्रकाश | कार्श्य | उदराधिकार ४१ | शोथ निदान चि. |
| हारीत संहिता | शोफ चिकित्सा | जलोदर चिकित्सा | प्रमेह चिकित्सा |
| भेल संहिता | मूत्रकृच्छ चिकित्सा | उदर चिकित्सा | ऊरुस्तंभ चिकित्सा |

वरील कोष्टकावरुन भिन्न ग्रंथामध्ये उदर रोगाचा क्रम एकसारखा नाहीं असे दिसून येतें. चरकाच्या चिकित्सा स्थानांतील १३ व्या अध्यायांत उदर रोगाच्या निदानादींचें त्याप्रमाणें चिकित्सेचे सम्यक् सुस्पष्ट वर्णन केलेले आहे. परंतु सुश्रुत संहिता, अष्टांग संग्रह व अष्टांग हृदय यामध्यें निदानाचें वर्णन निदान स्थानांत व चिकित्सेचें वर्णन चिकित्सास्थानांत स्वतंत्र केलें आहे. चरक संहितेमध्यें उदर रोगाध्यायापूर्वी श्वयथु रोगाचें वर्णन केलेले आहें. श्वयथु आणि उदर " शोथभेदत्वादुदरस्य शोथचिकित्सानन्तरमुदर-चिकित्सितमुच्यते " । यांचा प्राय: निकटचा संबंध असल्यानेंच असा क्रम घेतला आहे. उदरांत उपद्रव म्हणून अर्श पहावयास मिळतात. यासाठीं चरक संहितेमध्यें अर्शाचें वर्णन उदर रोगानंतर केलेले आढळतें.

सुश्रुतानें उदर रोगाच्या वर्णनापूर्वी प्रमेह त्रिदोषात साधर्म्य व महाव्याधिसामान्य व नंतर मूढगर्भाचें विवेचन केलें आहे. प्रमेह तथा उदर रोग दोहोंमध्येंही उदकवाही स्त्रोतसाची विकृति लक्षण म्हणून आढळून येतें. प्रमेहामध्यें मूत्रप्रवृत्ति अधिक प्रमाणांत असते तर उदरामध्यें मूत्र-प्रवृत्ति अल्प प्रमाणात असते. दोहोंमध्यें समान स्त्रोतसांची दुष्टी

असल्यानें व प्रमेह निदानार्थकर व्याधि असल्यानें प्रमेहानंतर उदराचें वर्णन केलें आहे. दोहोंमध्यें व्यवच्छेदक निदान करणें आवश्यक असल्यानें उदरानंतर मूढगर्भ असा क्रम आहे. अष्टांग हृदयकारांनी या दोहोंतून भिन्न असा तिसराच क्रम स्विकारला आहे. उदर रोगापूर्वी निदान स्थानामध्यें विद्रधि - वृध्दि रोग ह्याप्रमाणें गुल्माचें वर्णन आहे. व्याधिविनिश्च करतां यावा म्हणून हा क्रम घेतला आहे. उदरी रुग्णांत " वृध्दि " दिसून येते. उदरवृध्दि हे सामान्य लक्षण वरील विकारांत विशेषत: आढळतें. उदर रोगानंतर पाण्डु रो, शोफ, विसर्प यांचे वर्णन केले आहे. उदरी रुग्णांत पाण्डुता असते. रक्तवह स्त्रोतसाचे मूल यकृत व प्लीहा आहे. रक्तदृष्टीनें परतंत्र पाण्डु दिसून येतो. त्यामुळे यकृदाल्युदर, प्लीहोदर, जलोदर वगैरे मध्यें " उदरवृध्दि " हे लक्षण वैशिष्ट्यानें दिसून येतें.

शाङ्.र्गधर संहितेमध्यें उदर रोगापूर्वी हृद्रोग व नंतर गुल्मरोगाचें वर्णन केलेलें आहे. उदराच्या निदानार्थकर व्याधींत हृद्रोग आढळतो. हृदय रसाचें स्थान आहे व हृद्रोगांत रसदुष्याची विकृति असते. यामुळे जलोदराचा व हृदरोगाचा संबंध आहे. आधुनिक दृष्टीने हृद्जन्य जलोदराचे ( Ascites due to Cardiac involvement ) रुग्ण मिळतात. गुल्मरोग तथा उदर रोगांत उदरवृध्दि संभावनीय आहे. याकरतां व्यवच्छेदक निदानासाठीं प्रथम हृद्रोग, त्यानंतर उदर व उदरानंतर गुल्म आहे.

चक्रपाणी विरचित चक्रदत्त ग्रंथामध्यें उदरापूर्वी स्थौल्यरोगाची चिकित्सा व नंतर यकृत, प्लीहा, शोथ रोगचिकित्सेचें वर्णन केलेले आहे. स्थौल्य मेदोवहस्त्रोतोदुष्टिजन्य व्याधी आहे. उदर व मेदोवृध्दि या व्याधींमध्यें उदरवृध्दि लक्षणांचा व्यवच्छेद करावा लागतो. तसेंच स्त्रोतोदुष्टीची चिकित्साही दोन्हीमध्यें एकच आहे. यकृत, प्लीहा रोग चिकित्सा उदरांत करावी लागते. प्लीहाशांग्रहणीदोषकर्षणात..... निदाना-

...८

धकर व्याधि म्हणून प्लीहेचा उल्लेख असल्यानें मूलविकृतीवरील चिकित्सा करावीच लागते. शोथचिकित्सा व उदर चिकित्सेचे तत्व एकच आहे.

माधव निदानांत चक्रदत्ताचाच क्रम स्विकारलेला आहे. परंतु यकृत-प्लीहा रोगांचे उदर रोगांतर्गत प्लीहोदर आणि यकृद्दाल्युदर त्यानें वर्णन केले आहे. अति कृश व्यक्तिला प्लीहा, कास, क्षय, गुल्म ,अर्श,श्वास, ग्रहणी, व उदरोग होतात. त्यामुळे भावमिश्रांनी काशार्धिकारानंतर उदराधिकाराचे वर्णन केले. शोथ चिकित्सेनंतर हारीतसंहितेत ह उदररोगाचे वर्णन दिले आहे. शोथ उदराचा निदानार्थकर व्याधि आहे. मूत्रकृच्छ्र व उदर दोहोंमध्यें मूत्राल्पता हे लक्षण असते. तसेच उदर वर्चस्तंभ दोहोंमध्यें अग्निमांद्य असते. अपाचित आहाररस त्या त्या स्थानांत जाऊन ते ते लक्षण निर्माण होते. उदर रोगाविषयीं उपर्युक्त पूर्वापर रोगांवर दृष्टिक्षेप टाकल्यानंतर असा निष्कर्ष काढला जातो कीं, उदराच्या व्यवच्छेदक निदानाचे ज्ञान प्राचीनांनाही होते. उदा. मूढगर्भ, स्थौल्य, वगैरे ऐतिहासिक पार्श्वभूमि पाहून असे अनुमान काढले जातें कीं, वैदिक कालापासून आतापर्यंत उदरावर कांहीं ना कांही संशोधन होते आहे, तो क्रम चालू ठेवण्याचा या प्रबंधाचा उद्देश आहे.

-x-x-x-x-x-

..९